# उत्कृष्ट अपराधसिध्दी माहे नोव्हेंबर – २०१८

## गोरेगाव पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | गोरेगाव पोलीस ठाणे गुरक्र.४६६/२००७, कलम ४५२, ३७६ सह कलम ७५ भा.दं.वि. |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक २७/०६/२००७ रोजी १७.१५ वा. चे सुमारास |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | भगतसिंग नगर नं. २, चौक गल्ली, चर्च गल्लीचे समोर, लिंक रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई |
| ४ | **फिर्यादी** | .................. |
| ५ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | –– |
| ६ | **हस्तगत मालमत्ता** | |
| ७ | **हस्तगत हत्यार** | –– |
| ८ | **आरोपी अटक** | **अनिल उर्फ अन्या विठ्ठल कोळेकर**<br>**अटक दिनांक २८/०६/२००७ रोजी** |

- गोरेगाव पोलीस ठाणे गुरक्र.४६६/२००७, कलम ४५२, ३७६ सह कलम ७५ भा.दं.वि. या गुन्हयात दिनांक २७/०६/२००७ रोजी १७.१५ वा. चे सुमारास भगतसिंग नगर नं. २, चौक गल्ली, चर्च गल्लीचे समोर, लिंक रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई याठिकाणी फिर्यादी या घरामध्ये एकटयाच असताना, यातील आरोपी नामे अन्या कोळेकर हा घरामध्ये घुसुन फिर्यादींशी लगट करण्याचा प्रयत्न करू लागला व त्याने फिर्यादी यांचे तोंड दाबुन बळजबरीने त्यांचे कपडे काढले व फिर्यादी यांचे संमतीशिवाय जबरी लैंगिक अत्याचार केला म्हणुन फिर्यादी यानी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २७/०६/२००७ रोजी कलम ४५२,३७६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

- गोरेगाव पोलीस ठाणेच्या पथकाने पोलीस ठाणे हद्दित कोंबिंग ऑपरेशनचे आयोजन करून सदर कोंबिंग दरम्यान गुन्हयातील पाहिजे आरोपीत अन्या कोळेकर हा भगतसिंग नगर नं. १, २ येथील खाडीलगतच्या झुडपांमध्ये लपून बसलेला असता त्याचा शोध घेवुन त्यास दिनांक २८/०६/२००७ रोजी नमुद गुन्हयात रितसर अटक केले. गुन्हयाचे तपासादरम्यान नमूद अटक आरोपीतावर गोरेगाव पोलीस ठाणे येथे शरीराविरूद्धचे एकूण ९ गुन्हे दाखल असल्याने सदर पथकाने कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन दिनांक ०७/०१/२०१५ रोजी मा. महानगर दंडाधिकारी, २४ वे न्यायालय, बोरीवली, मुंबई येथे कोर्ट केस क्र.१९०२/पीडब्ल्यू/२००७ अन्वये दोषारोप पत्र सादर केले तसेच सदर आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळवुन मा. विशेष पोक्सो न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे दि. २३/०२/२०१५ रोजी स्पेशल केस क्र.०७/२००७ अन्वये सदरचा गुन्हा वर्ग करण्यात आला.

- नमूद अटक आरोपीताविरूद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केल्यानंतर सदर गुन्हयाची सुनावणी चालू होण्यापूर्वी नमूद अटक आरोपीतास जामीन मंजूर झाल्यानंतर तो सदर गुन्हयाचे सुनावणीकामी मा. न्यायालयात हजर रहात नव्हता म्हणुन त्यास फरार घोषित करण्यात आले होते. नमूद आरोपीताचा शोध चालू असताना तो मिळून येत नसल्याने व सदर गुन्हयाचे सुनावणी आरोपी विना न्यायालयात होत नसल्याने तत्कालीन पोलीस उप आयुक्त विक्रम देशमाने, परीमंडळ ११ बोरीवली, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली बांगुरनगर पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. महेंद्र दोरकर, स.पो.नि.श्रीशैल्य कोले व स्टाफ यांचे विशेष पथक तयार करुन सदर जाहीरनामा असलेला फरारी आरोपी यास लवकरत लवकर अटक करण्याचे

मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. त्यानंतर नमूद आरोपीताचा शोध चालू असताना तो पुणे जिल्हयातील सांगवी पोलीस ठाणेच्या गु.नो.क्र २२०/१५ कलम ३०२,३४ भादवि. या गुन्हयात अटक असुन येरवडा कारागृहात असल्याची माहिती सदर पथकास प्राप्त झाली. त्याबाबतचा अहवाल मा. न्यायालयास दिल्यानंतर मा. न्यायालयाने नमूद आरोपीतास गोरेगाव पो. ठाणे गु.नों.क्र. ४६६/२००७, कलम ४५२, ३७६, ७५ भादंविसं. या गुन्हयाचे सुनावणीकामी हस्तांतर करण्याबाबतचे आदेश मा. न्यायालयाने मा. अधिक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह यांना दिले.

- त्यानंतर नमूद अटक आरोपीत अनिल उर्फ अन्या विठ्ठल कोळेकर हा पुन्हा जामीनावर मुक्त होवुन फरार होवु नये म्हणुन सदर गुन्हयाची सुनावणी जलदगतीने व्हावी या करीता सदर पथकाने नमुद गुन्हयातील २३ साक्षीदारांपैकी महत्वाचे व मोजके असे ०७ साक्षिदारांना प्रत्येक सुनावणीच्या वेळी मार्गदर्शन करून सदर साक्षीदार वेळेवर न्यायालयात हजर राहुन योग्य प्रकारे साक्ष देतील याची दक्षता घेतली, तसेच आरोपीता विरूद्धचे भक्कम पुरावे मा. न्यायालयासमक्ष उत्कृष्टरित्या सादर करण्यात आले. सदर पथकाने अटक आरोपीतांकडे कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मा. विशेष पोक्सो न्यायालय, मुंबई येथे सदरचा गुन्हयाचे दोषारोप पत्र सादर केले.

- सदर पथकाने मा. विशेष सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल विहित वेळेत सादर केला. सदर पथकाने पुरक साक्षीदार/पंच सादर करून मा. विशेष सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई यांनी दिनांक ३०/११/२०१८ रोजी आरोपी नामे अनिल उर्फ अन्या विठ्ठल कोळेकर वय २२ वर्षे यास खालील प्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

- मा. न्यायालयाने अटक **अनिल उर्फ अन्या विठ्ठल कोळेकर** यास दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :—

**अ)** भादवि. कलम ३७६ प्रमाणे **आजन्म कारावास** व रु.२५,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ वर्षे सश्रम कारावास,

**ब)** भादवि. कलम ४५२ प्रमाणे **०५ वर्षे सश्रम कारावास** व रु.१,०००/—द्रव्यदंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास,

दोषसिध्द आरोपीताने उपरोक्त सर्व शिक्षा एकत्र भोगायच्या आहेत.

- फिर्यादी घरामध्ये एकटया असताना घरामध्ये घुसुन फिर्यादींशी लगट करण्याचा प्रयत्न करूने फिर्यादी यांचे तोंड दाबुन बळजबरीने त्यांचे कपडे काढून फि''चे संमतीशिवाय जबरी लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस गोरेगाव पोलीस ठाणेच्या पथकाने अटक करून त्याचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. विशेष सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस शिक्षा झालेली आहे.

- सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे नोव्हेंबर — २०१८ चे **बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

- सदर गुन्हयाची मा. न्यायालयाचे अंतीम निर्णयाची प्रत सोबत जोडलेली आह

- सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने '' उत्कृष्ट अपराधसिध्दी '' माहे **नोव्हेबर — २०१८** या बक्षिसाकरीता शिफारस करण्यात येत आहे.

**गोरेगाव पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार नांव व हुद्दा | अधिकारी/अंमलदार यांची कामगिरी |
|---|---|---|
| १ | **सपोनि. श्री. सुरेश आव्हाड (तपास अधिकारी)** | प्रस्तुत गुन्हयाचा अतिशय उत्कृष्ठ तपास करून शाबीत होण्यासारखा पुरावा गोळा केला व दोषारोप पत्र सादर केले. आरोपीतांना साफळा रचून मुद्देमालासह केरळ येथून अटक केली. सुनावणी दरम्यान सर्व तारखांना हजर राहिले, सुणावणीशी संबधित सर्व बांबीचा पाठपुरावा करून आरोपीतांना सजा होईल याबाबत प्रयत्नशील राहिले. |
| २ | **पो.ह.२४१७९/ श्री. भाऊसाहेब लक्ष्मण काकड ( गुन्हे तपास मदतनिस)** | यांनी तपासादरम्यान तपास अधिकारी सुरेश आव्हाड यांचे सोबत साफळा रचणे, आरोपी पकडणे, कागदपत्रे बनविणे, मुद्देमाल हस्तगत करणे, इत्यादी कामगिरी करून गुन्हयाचा तपास चांगल्या प्रकारे होण्याकरीता तपास अधिकारी यांना सर्वोतोपरी सहाय्य केले. |
| ३ | **पो.नि. (गुन्हे) श्री. संजय राजाराम मोहिते,** | प्रस्तुत गुन्हयांच्या सुनावणी दरम्यान तपास अधिकारी, पैरवी कर्मचारी, पोलीस अभियोक्ता व साक्षीदार यांच्यामध्ये समन्वय ठेवला, गुन्हयाच्या सुनावणीच्या दैनदिंन आढावा घेतला, सुनावणी दरम्यान आरोपी सुनावणीस हजर राहत नसल्याने त्यांच्याविरूध्द अजामिनपात्र वॉरंट जारी करून आरोपींना केरळ येथून अटक करून न्यायालया समोर हजर केले. साक्षीदार साक्षीस हजर राहतील याकडे लक्ष दिले तसेच पैरवी कर्मचारी व तपास अधिकारी यांच्या मदतीने साक्षीदारांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. |
| ४ | **पो.ह.९३५६/ श्री. अनिल यशंवत राऊत** | सदर गुन्हयाच्या सुनावणीमध्ये दैनदिंन लक्ष दिले. घडणाऱ्या घडामोडीबाबत पो.नि. गुन्हे यांना माहिती दिली. साक्षीदार यांना तपास अधिकारी व पोलीस अभियोक्ता यांचेशी भेटवून त्यांना साक्षीबाबत अवगत केले. गुन्हयातील मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वेळोवेळी सादर केला व गुन्हयाची सुनावणी पुर्ण होवून निकाल लागेपर्यत कसोशीने पाठपुरावा केला. |

——— ००० ———